# कौशल्य विकास आणि नाविन्यपूर्ण अभ्याक्रमावर शासनाचा भर !

महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत ; फ्यूएल बिझनेस स्कूलच्या वार्षिक संमेलनाचा शुभारंभ



**पुणे / प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी आवश्यक कौशल्य विकास आणि नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमावर शासनाचा भर आहे, तसेच महिला आणि मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरण बनविण्याचे काम सुरू असल्याचे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी केले.

भूगाव येथील फ्यूएल बिझनेस स्कूलच्या वार्षिक संमेलन व भविष्यवेधी कौशल्य चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी फ्यूएलचे संस्थापकीय अध्यक्ष केतन देशपांडे, मुख्य मार्गदर्शक संतोष हुरलीकोप्पी, मनोज पोचाट यांच्यासह विविध कंपन्यांचे सामाजिक दायित्व निधी विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

अलिकडच्या काळात शिक्षण क्षेत्रात वेगाने बदल झाले आहेत असे सांगून मंत्री कु. तटकरे म्हणाल्या, दहा पंधरा वर्षापूर्वी पदवी मिळविणे, किंवा त्यापूर्वीच्या पिढीत दहावी-बारावी उत्तीर्ण होणे ही मोठी बाब होती. आज केवळ पदवी, पदव्युत्तर पदवी मिळविणे एवढेच नव्हे तर उज्ज्वल भवितव्य देऊ शकेल असे अभ्यासक्रम, प्रशिक्षण निवडणे गरजेचे ठरले आहे. त्यासाठी कौशल्य विकासाचे आणि व्यावसायिक अभ्यासक्रम पूरक ठरू शकतात. त्यामुळे फ्युएल बिझनेस स्कूलने असे अभ्यासक्रम समाजाच्या सर्व घटकातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी घेतलेला पुढाकार प्रशंसनीय आहे.

त्या पुढे म्हणाल्या, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षण घेण्यास अडचण निर्माण होत असते. फ्यूएल बिझनेस स्कूल विद्यार्थ्यांना व्यवस्थापनाचे अत्याधुनिक कौशल्यांचे दर्जेदार शिक्षण देत असून ही संस्था आर्थिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थांना शिष्यवृत्ती देण्याचे मोलाचे कार्य करीत आहे. संस्थेने पुण्यातच नाही तर इतर ठिकाणीही विद्यार्थ्यांच्या हिताच्यादृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन करावे. संस्थेने शासनाच्या कौशल्य विकास, नाविन्यता विभागासोबत सामंजस्य करार केले असल्यास त्यांना शासनाकडून सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात येईल.

शासन आणि शिक्षण संस्थांनी एकत्र काम केल्यास निश्चितच चांगले यश प्राप्त होईल, असे सांगून फ्यूएल बिझनेस स्कूलच्या पुढील वाटचालीस आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

श्री. देशपांडे यांनी फ्यूएल स्कूलच्या कार्याची माहिती दिली. यावेळी मंत्री कु. तटकरे यांच्या हस्ते उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. ५० प्लस इन्सपायरेशन स्टोरीज ऑफ फ्यूएल' या पुस्तकाचे व फ्यूएल युनिव्हर्सिटीच्या फलकाचे अनावरण करण्यात आले.

## थोडक्यात

### समाज कल्याण विभागाच्यावतीने कर्ज मंजुरी मेळावा संपन्न

**पुणे** : सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाच्यावतीने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ व संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या संयुक्त विद्यमाने कर्ज प्रकरण मंजूरी देण्याबाबत मेळावा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, येरवडा येथे संपन्न झाला.

यावेळी समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाळासाहेब सोळंकी, सहायक आयुक्त विशाल लोंढे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक श्रीकांत कारेगावकर, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक शिवाजी मांजरे, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक अमोल शिंदे, बार्टीचे प्रकल्प अधिकारी व समतादूत आदी उपस्थित होते.

श्री. कारेगांवकर यांनी कर्ज प्रकरणाच्या मंजुरीबाबत आवश्यक बाबींवर मार्गदर्शन करुन बँकेच्यावतीने सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

## सराईत गुन्हेगारांची परेड

**पुणे** : पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारताच शहरातील गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढण्यास सुरुवात केली आहे. पोलिस आयुक्तालयात मंगळवारी शहरातील सर्व गुन्हेगारी टोळ्यांतील सराईत गुन्हेगारांची परेड घेण्यात आली. सर्व रेकॉर्डवरील गुन्हेगारांना बोलावून सज्जड दम भरण्यात आला. कुख्यात गजानन मारणे, नीलेश घायवळ, बाबा बोडके, बंडू आंदेकर, टिपू पठाण, कंचीले अशा प्रमुख १५ गुन्हेगारी टोळ्यांसह नव्या उभरत्या ५० टोळ्यांतील सुमारे २६७ अधिक सराईत गुन्हेगारांना परेडसाठी पोलिस आयुक्तालयात हजेरीसाठी बोलावण्यात आले होते. कोणताही गुन्हा करायचा नाही. गुन्हेगारीस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पाठिंबा द्यायचा नाही. बेकायदेशीर कृत्यात सहभागी व्हायचे नाही, सोशल मीडियावर व्हिडिओ किंवा रील्स टाकायच्या नाहीत. असा इशारा पोलिसांना दिला आहे.

## धोलवडच्या शिवनेरी विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न

२९ वर्षांनतर एकत्र येत जल्लोष स्नेहमेळावा साजरा

**ओतूर / प्रतिनिधी**

धोलवड (ता.जुन्नर ) येथील शिवनेरी विद्यालयातील सन १९९५ च्या इयत्ता दहावीच्या बॅचचे माजी विद्यार्थ्यांनी सुमारे २९ वर्षांनतर एकत्र येत जल्लोष स्नेहमेळावा साजरा केला. धोलवड येथील सत्यवान नलावडे यांच्या फार्म हाउसवर मोठ्या उत्साही , आनंदी व गत आठवणींना उजाळा देत सर्वच उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी या जल्लोष स्नेहमेळाव्याचा आनंद लुटला अशी माहिती मेळाव्याचे संयोजक सचिन नलावडे,संगिता रोकडे ,सत्यवान नलावडे,रसवंती पानसरे यांनी संयुक्तपणे दिली.

प्रारंभी रसवंती पानसरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर नेतवडचे उपसरपंच व माजी विदयार्थी पोपटराव गायकवाड यांनी प्रास्ताविकात या स्नेहमेळाव्यामागील संकल्पनेचा उद्देश स्पष्ट केला. या स्नेहमेळाव्यासंदर्भात अधिक माहिती देताना संयोजकांनी सांगितले की,गेली एक ते दीड वर्ष आम्ही मित्र मैत्रिणी व्हाटसअप ग्रुपच्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात होतो. त्या माध्यमातूनच या जल्लोष स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यासाठी जुन्नर आंबेगाव तालुक्याबरोबरच पुणे , मुंबई ,औरंगाबाद , शिरूर , राजगुरुनगर आदी ठिकाणांहून सर्व मित्र मैत्रिणी एकत्र आले होते. सर्वप्रथम सर्वानी एकमेकांचा परिचय देत आठवणींच्या हिंदोळ्यावर गतस्मृतींना उजाळा दिला. इयत्ता दहावीच्या बॅचमधील बाबुलाल शेख यांना महाराष्ट्र राज्याचा ताशा सम्राट हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा



सर्व मित्र परिवाराच्यावतीने सत्कार करण्यात आला.

रविंद्र अहिनवे , वैशाली भालेकर ,सत्यवान नलावडे यांनी गीतगायन करून सर्वांनाच मंत्रमुग्ध केले. ह.भ.प. मंगेश भागवत यांनी अध्यात्मिक मनोगत सादर केले. रसवंती पानसरे यांनी काव्य वाचन केले. शाळेतील आठवणींना उजाळा देत अनेक विषयांवर सर्वच मित्र मैत्रिणींनी एकमेकांशी संवाद साधला.त्यामध्ये प्रामुख्याने कावेरी कुंभार,अमोल नलावडे,गणेश शिंगोटे ,निर्मला रोकडे ,कृष्णप्रिया मिडगुले ,कांचन दरेकर , ललिता पानसरे ,वर्षा डावखर ,वर्षा गोरडे , सोनल भागवत,नयना तांबे ,पोपट गायकवाड , सुरेश मुंढे , सुवर्णा चव्हाण , किरण दळे ,अशोक डुंबरे ,रुपाली लेंडे ,मनिषा वाबळे यांच्यासह सर्वच उपस्थितांनी चर्चेत सहभाग घेतला. दरवर्षी सर्वानी एकत्र येण्याचा निर्णय घेवून स्नेहमेळाव्याची सांगता करण्यात आली.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रसवंती पानसरे यांनी केले.

## महसुली कायद्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी राज्यस्तरीय समिती गठीत

सुधारणा करण्याच्या अनुषंगाने सूचना पाठवाव्यात

**पुणे / प्रतिनिधी**

राज्यातील महसूल कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात फेरबदल, नवीन कार्यालये निर्मिती तसेच महसुली कायद्यांमध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी उमाकांत दांगट यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून महसूल कायद्यांमध्ये कालसुसंगत सुधारणा करण्याबाबत काही सूचना असल्यास १५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत पाठवाव्यात, असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त तथा समितीच्या सदस्य सचिव वर्षा लड्डा-उंटवाल यांनी केले आहे.

महसूल व वन विभागाच्या २५ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या आदेशानुसार ही समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन आयुष्यावर परिणाम करणाऱ्या बाबी, सामाजिक परिस्थितीत झालेला बदल व इतर अनुषंगिक बाबींमुळे महसूल कामकाजाशी संबंधित महत्त्वाच्या कायद्यांमध्ये कालानुरुप आवश्यक बदलांबाबत अभ्यास करून शासनास अहवाल सादर करणार आहे.

आवाहन महसूल विभागाशी संबंधित महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम १९४७, महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम १९४८ व त्याखालील नियम, महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ व त्याअंतर्गत असलेले नियमांमध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने सूचना समितीच्या कार्यालयाकडे समक्ष, पोस्ट, ईमेलद्वारे (rev. reformcomtgmail.com ) अथवा सदस्य सचिव तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, विधान भवन,बंडगार्डन रोड, पुणे- ४११००१ या पत्त्यावर पाठवाव्यात. ज्यांना समक्ष सूचना सादर करावयाच्या आहेत त्यांना १६ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता समितीला सादर करता येतील, असेही श्रीमती लड्डा यांनी कळविले आहे.

## यशस्विनी वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने दिव्यांगांना व्हीलचेअर भेट



**शिरूर / प्रतिनिधी**

यशस्विनी वेल्फेअर फाऊंडेशनच्या वतीने दिव्यांग व एकल महिला साठी शिरुर शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान या ठिकाणी नुकताच हळदी कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमामध्ये जवळपास शंभर महिलांनी सहभाग घेतला होता. या महिलांना पोलिस महिला दक्षता समितीच्या माजी अध्यक्षा शोभना पांचगे सामाजिक कार्यकर्त्या राणी चोरे ओम शांती शकुंतला बहेन शिरूर ग्रामीण रुग्णालयातील परिचारिका सुरेखा भोस यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन देण्यात आले यशस्विनी वेल्फेअर फाऊंडेशनच्या सदस्या स्नेहल बिगर यांनी व्हीलचेअर. सायकल, चेअर खुर्ची दिव्यांग मुलींना भेट दिली. यावेळी बोलताना संस्थेच्या सचिव नम्रता गवारे यांनी सांगितले की सर्व सामाजिक संस्था यांनी पुढे येऊन सामाजीक बांधीलकी म्हणून एकल महिलांची आर्थिक बाजू चांगली होण्यासाठी मदत करावी. या कार्यक्रमासाठी श्रुतिका झांबरे सुनिता डोंगरे मनीषा वाळुंज मनीष सोनवणे पत्रकार शोभा परदेशी यांच्यासह महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते

## कोयत्यासह तडीपार गुंडाला अटक

**पिंपरी** : कोयता घेवून फिरणाऱ्या तडीपार गुंडाला चिचंवड पोलिसांनी अटक केली आहे. ही कारवाई चिंचवड लिंकरोड येथे केली आहे.

अमन आजिम शेख (रा. पिंपरी) असे अटक आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पिंपरी पोलिस ठाण्यातील पोलीसअंमलदार रोहित पिंजरकर (वय ३४) यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीला पिंपरी-चिंचवड पोलिसांनी तडीपार केले होते.


**ग्रामपंचायत वाडेबोल्हाई, ता. हवेली, जि. पुणे**

**खुली बी-१ निविदा सूचना क्र. ३ सन २०२३-२४**

सरपंच, ग्रामपंचायत वाडेबोल्हाई, ता. हवेली, जि.पुणे यांचे वतीने तर्फे जि.प.पुणे नोंदणीकृत कंत्राटदारांकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील सीलबंद निविदा मागवण्यात येत आहेत. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत वाडेबोल्हाई, ता. हवेली जि.पुणे यांच्याकडून दि. ०७-०२-२०२४ ते दि. १३-०२-२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत देण्यात येतील व भरून पाठविलेले मोहरबंद निविदा दि. ०७-०२-२०२४ ते दि. १३-०२-२०२४ पर्यंत सायं. ०४.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत वाडेबोल्हाई, ता. हवेली येथे स्वीकारण्यात येतील. मोहरबंद निविदा दि. १४-०२-२०२४ रोजी सं. ०४.०० वा. उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | निविदा फी रु. | ठेकेदार वर्गीकरण | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे वाडेबोल्हाई येथे बारांगनीवस्ती रस्ता डांबरीकरण करणे, ता. हवेली (ग्रामनिधी) | ८,४६,५१०/- | ५९०/- | सर्वसाधारण खुला वर्ग | ६ महिने |

**निविदेतील अटी व शर्ती:- १.** कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. **२.** कोऱ्या निविदा नमुन्याची फी ग्रामपंचायत वाडेबोल्हाई, ता. हवेली येथे भरून निविदा उपलब्ध होतील. **३.** ठेकेदाराने कोरी निविदा मागणी करताना प्रमाणित नोंदणी दाखला सादर करणे आवश्यक आहे. **४.** कोऱ्या निविदा रक्कमेच्या १% इसारा रक्कम कोणत्याही बँकेचा डी. डी ग्रामपंचायत वाडेबोल्हाई या नावे असलेला लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय आर्थिक लिफाफा उघडला जाणार नाही. **५.** कोऱ्या निविदांच्या तांत्रिक लिफाफा मध्ये द्यावयाची कागदपत्रे १. निविदा फी पावती, २. नोंदणी प्रमाणपत्र, ३. प्राप्तीकर प्रमाणपत्र, ४. वस्तू व सेवा कर प्रमाणपत्र.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत वाडेबोल्हाई, ता. हवेली. जि पुणे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत वाडेबाल्हाई, ता. हवेली. जि पुणे**



**एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड**
(आधीची एल&टी फायनान्स लि, स्कीम ऑफ अमालगमेशन अंतर्गत एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. शी संलग्न होऊन ज्याची अंमलबजावणी 4 डिसेंबर 2023 रोजी झाली)
**नोंदणीकृत कार्यालय:** नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177 कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Finance

**तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव**

एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी ''**सार्वजनिक ई-लिलावाद्वारे**'' ''**जिथे आहे जसे आहे तत्वावर**'' आणि ''**ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर**'' खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 30.01.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. परमजीतसिंग सुजानसिंग अरोरा 2. सरनजीतकौर परमजीतसिंग अरोरा 3. अरोरा एंटरप्राइजेस (त्याच्या माध्यमातून मालक परमजीतसिंग सुजानसिंग अरोरा) | मालमत्तेचा पत्ता - निर्माण सेरेन इमारतीतील चौथ्या मजल्यावरील विंग 'बी' मध्ये फ्लॅट क्रमांक 408, चटई क्षेत्र 810 चौ.फूट संबंधित सील करण्यायोग्य क्षेत्र 1181 चौ.फूट + टेरेस 65 चौ.फुट, + पार्किंग क्रमांक 23 गाव-उंद्री, तालुका: हवेली, जिल्हा: पुणे येथे सर्व्हे क्रमांक 24 हिसा क्रमांक 1/1 (जुना सर्व्हे क्र. 23) वर बांधण्यात आलेले निर्माण सेरेन नावाच्या इमारतीत. आणि आणि त्याच्या चौसीमा खालील प्रमाणे<br>सीमा: पूर्व - हरिश्चंद्र पुणेर आणि इतरांची मालमत्ता; दक्षिण - न्याती बिल्डर यांची मालमत्ता; पश्चिम - सचिन दिलीप पुणेकर आणि रावत बिल्डर यांची मालमत्ता; उत्तर - 15 मीटर रोड | PUNHL17001696 & PUNHL19000085 | 13 ऑक्टोबर 2023 | रु. 4,63,203/- | रु. 1,16,27,239.02/- | रु. 46,32,030/- | 19-02-2024 | 26-02-2024 |
| | मालमत्तेचा पत्ता - निर्माण सेरेन इमारतीतील सातव्या मजल्यावरील विंग 'ए' मधील फ्लॅट क्रमांक 702, चटई क्षेत्र 810 चौ.फूट संबंधित सील करण्यायोग्य क्षेत्र 1181 चौ.फूट + टेरेस 65 चौ.फुट, + पार्किंग क्रमांक 71 गाव-उंद्री, तालुका: हवेली, जिल्हा: पुणे येथे सर्व्हे क्रमांक 24 हिसा क्रमांक 1/1 (जुना सर्व्हे क्र. 23) वर बांधण्यात आलेले निर्माण सेरेन नावाच्या इमारतीत. आणि त्याच्या चौसीमा खालील प्रमाणे<br>सीमा: पूर्व - हरिश्चंद्र पुणेर आणि इतरांची मालमत्ता; दक्षिण - न्याती बिल्डर यांची मालमत्ता; पश्चिम - सचिन दिलीप पुणेकर आणि रावत बिल्डर यांची मालमत्ता; उत्तर - 15 मीटर रोड | PUNHL17001696 & PUNHL19000085 | 13 ऑक्टोबर 2023 | रु. 3,77,643.30/- | रु. 1,16,27,239.02/- | रु. 37,76,433/- | 19-02-2024 | 26-02-2024 |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता ''**जशी आहे जिथे आहे तत्वावर**'' आणि ''**जशी आहे ज्या स्थितीत आहे**'' त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **24/02/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **26/02/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **27/02/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात, **नाव - शेखर काळे, संपर्क क्रमांक 9823271111, ऑफिस एल&टीफायनान्स होल्डिंग्स लिमिटेड, ऑफिस क्रमांक 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005. आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटीरोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (04), मुंबई 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 07.02.2024
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड


**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com